<u>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक</u>

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :५८८/२०२२/नाशिक**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. जितेंद्र शिवाजी सुर्यवंशी,<br>रा. मु. दऱ्हाणे, पो. मुंजवाड,<br>ता. बागलाण, जि. नाशिक. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, दऱ्हाणे,<br>ता. बागलाण, जि. नाशिक. |

**<u>सुनावणी दिनांक २३/०२/२०२४</u>**

तक्रारदार यांनी दिनांक ०७/१२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक २३/०२/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार अनुपस्थित आहेत आणि तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक ०७/१२/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, तक्रारदार यांच्या दि.२८/१०/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन आजपावेतो माहिती हस्तांतरीत केली नाही. दि. २८/१०/२०२२ रोजी सादर केलेल्या माहिती अर्जान्वये दि. १९/०५/२०२१ रोजी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. २९/०६/२०२१ रोजी प्राप्त पत्रावर जिल्हा परिषदने केलेल्या कार्यवाहीच्या साक्षांकित प्रती मिळण्याची विनंती केली होती.

३) तसेच उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तक्रारकर्ता यांनी मूळ तक्रार अर्ज जिल्हा परीषदेकडे दिला होता आणि सदर तक्रार अर्जासंदर्भात दि. २९/०६/२०२१ च्या पत्रान्वये पंचायत समितीकडून अहवाल मागविण्यात आला होता. मात्र तक्रारकर्ता यांनी याबाबतची माहिती, माहिती अर्जान्वये ग्रामपंचायत कार्यालय दऱ्हाणे यांचेकडून मागविलेली आहे, असेही दिसून येते. त्यामुळे सदरची तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक ५८८/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

जावक क्र आ-२९९५ 04 OCT 2024